ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.III/Sept 11pp.1-4

Research Paper

# झाडीपट्टीच्या तमाशातील समाजदर्शन

**डॉ. चंद्रकुमार राहुले**
मराठी विभागप्रमुख
जगत कला,वाणिज्य व इं.ह.पटेल विज्ञान महाविद्यालय,
गोरेगाव, जि.गोंदिया (म.रा.)

विदर्भ हा फार जुना प्रदेश आहे. कवी राजशेखर यांनी 'विदर्भ विषयः सरस्वती जन्मभू।' असा उल्लेख केला आहे. विदर्भ ही आर्यांची सर्वात जुनी वसाहत होती. अगस्ती ऋषीने मुंड जातीची राजकन्या लोपामुद्रा हिच्याशी विवाह केला. भगवान श्रीकृष्णाने अमरावतीच्या मंदिरातून रुक्मिणीचे हरण केले. ती विदर्भकन्या होती. ऋषभदेवाचा पुत्र विदर्भनायकाने येथे वसाहत स्थापन केली. त्यामुळे या प्रदेशाला 'विदर्भ' हे नाव प्राप्त झाले, असा भागवत पुराणात उल्लेख आहे. पूर्व विदर्भ म्हणजे झाडीपट्टी होय. या झाडीपट्टीत भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांचा समावेश आहे. येथील प्रदेश गर्द वनराईने, दाट जंगलाने आणि झाडाझुडुपांनी व्याप्त असल्याकारणाने या प्रदेशाला 'झाडीमंडळ' अथवा 'झाडीपट्टी' असे संबोधले जाते.

विदर्भाच्या प्राचीनतम लोककलांमध्ये तमाशा व दंडार या लोकनाट्यांचा प्रामुख्याने समावेश होतो. काळाच्या ओघात ही दोन्ही लोकनाट्ये लयास जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील लोकनाट्यांचा मुंबई–पुणे या महानगरांचा प्रवास सहज व सुलभ असल्यामुळे विदर्भाची ही दोन्ही लोकनाटये प्रकाशात यायला तेवढी संधी प्राप्त होऊ शकली नाही.

काही लोक तमाशा या शब्दाची तम्‌आशा अशी फोड करून ज्याच्यामुळे तमाची म्हणजे पापाचरणाची आस लागते, असा कलाप्रकार असे त्याचे वर्णन करतात. तमाशा या शब्दाचा अर्थ 'उघड देखावा' असा असून समाजातील प्रतिष्ठित वर्गात तमाशा हा हिणकस लोकांचा आचरट कलाप्रकार होय, अशी समजूत रूढ असल्याचेही म्हटले जाते. हे विधान सत्य मानले तर तमाशामुळे पापीवृत्ती वाढते असा अर्थ होईल; परंतु कोणताही समाज पापीवृत्तीचे समर्थन करेल असे वाटत नाही. तमाशामुळे पाप वाढले असते तर तमाशा हा कलाप्रकार केव्हाच नष्ट झाला असता, पण तसे घडले नाही. उलट महाराष्ट्रातील एक सर्वाधिक लोकप्रिय लोकनाटय म्हणून प्रसिद्ध आहे. असा हा लोककलाप्रकार हिणकस व आचरट ठरवून तथाकथित प्रतिष्ठित लोकांनी हे विधान बेजबाबदारपणे केले असे वाटते. त्यांच्या या अशा विधानामुळेच तमाशाला 'हिणकस', 'हिडीस' असा लक्षणीय अर्थ प्राप्त झाला आहे.

तमाशा हा मूळ अरबी शब्द असून त्याचा अर्थ 'प्रेक्षणीय दृश्य' असा आहे. तसेच तमाशातील कलगी–तुरा हे शब्दही परभाषीय आहेत. कलगी हा मूळचा तुर्की शब्द आहे तर तुरा हा मूळचा अरबी भाषेतील आहे. तमाशातील मुख्य पात्र 'शाहीर' हा शब्द अरबी भाषेतील आहे. त्यामुळे तमाशा मुसलमानाच्या प्रभावातून निर्माण झाला असावा, असा काही विद्वानांचा कयास आहे. असे असले तरी नामदेव व्हटकरांचे मत महत्त्वाचे वाटते. नामदेव व्हटकर तमाशा या शब्दाची व्याख्या करताना म्हणतात, "तमाशा हा मूळ शब्द पार्शीयन भाषेतील आहे. तेथून तो उर्दूत आला. उर्दूतून मराठी भाषेत येऊन रूढ झाला. उर्दू आणि पार्शी भाषेत याचा अर्थ मौजेचे आनंद देणारे किंवा आश्चर्यकारक दृश्य असा आहे. अरबी भाषेत तमाशा म्हणजे हालचाली, गती असा अर्थ आहे. भारतीय संस्कृतीकोशात तमाशा म्हणजे प्रेक्षणीय दृश्य व 'शाहीर' हे 'शायर म्हणजे कवी' या अरबी शब्दापासून तयार झालेले रूप आहे. तमाशा हा शब्द परभाषीय आहे असे मान्य केले किंवा शाहीर, कलगी, तुरा हे शब्द परभाषीय असले तरी तेवढ्यावरुन तमाशा परकीय होत नाही." या संदर्भात वि.कृ.जोशी लिहितात, "खेड्यात जत्रा, उत्सव, सण, इ. प्रसंगी लोकनाटयाचे जे प्रकार होत असत, त्यातील मुख्य प्रकार 'गंमत' या नावाने ओळखले जात. त्या काळातील लोकांच्या अभिरूचीस पटणाऱ्या अशा मनोरंजनाच्या साऱ्या गोष्टी 'गंमत' या सदरात येत असत. त्याला पुढे 'खेळ तमाशे' असे नाव पडले." यावरून खेड्यातील जत्रा, सण, उत्सव इ. प्रसंगी फार पूर्वीपासून तमाशा अस्तित्वात होता, हे दिसून येते. त्याला खेळ, तमाशे, गंमत अशी नावे असली तरी मनोरंजनाचे साधन म्हणून लोक सादर करीत असत व पाहत असत.

तमाशा हा कलाप्रकार महाराष्ट्रात सर्वत्र होत असला तरी त्यात स्थानपरत्वे वेगळेपणा जाणवतो. झाडीपट्टीतील तमाशात स्त्रिया नाचत नाहीत. स्त्रियांची वेशभूषा परिधान करून नाच्या मुले नाचत असतात.त्याला 'लमडा' असे संबोधले जाते. या परिसरातील तमाशाला 'खडीगंमत' असेही संबोधले जाते. उभ्याने सादर करून खडया आवाजात सादर करावयाचा मनोरंजनपर कलाप्रकार म्हणजे खडीगंमत होय. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडयात सादर होणारा ढोलकी फडाचा तमाशा वेगळा आहे. खानदेशी तमाशा वेगळा आहे. खानदेशी तमाशात स्त्रिया नाचण्याची परंपरा नसल्यामुळे नाचणारी पोरे नाचविली जातात. या तमाशात लावणी नसते. लावणीच्या ऐवजी हिंदी गीतांचा भरणा अधिक असतो.

सादरीकरणाच्या स्वरूपावरून, त्यातील गानप्रकारावरून तसेच प्रदेशपरत्वे निर्माण झालेल्या वैशिष्टयांच्या आधारे तमाशाचे प्रकार सांगताना डॉ.प्रभाकर मांडे लिहितात, "बारीचा तमाशा, ढोलकीचा तमाशा, खानदेशी तमाशा, वायदेशी तमाशा, खडीगंमत तमाशा, आदिवासींचा तमाशा, नवसाचा जलसा, लग्नविधितील कोल्हाटणीचा तमाशा व जागरणातील तमाशा." बारीचा तमाशा हा बैठकीतील असतो. ढोलकीच्या तमाशासाठी स्वंतत्र रंगमंचाची योजना असते. खडा तमाशा, राष्ट्रीय संगीत, खडातमाशा असे प्रकार विदर्भात दिसतात तर झाडीपट्टीत तमाशाला 'खडीगंमत' असेही संबोधतात.

विदर्भातील या झाडीपट्टीत तमाशा या लोककलेला जिवंत ठेवण्याचे कार्य करणारे अनेक शाहीर उदयास आले. चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयांतील प्रमुख शाहीर म्हणजे उत्तमराव शंभरकर, रामदास राजूरकर, रामदास मखरे, देवराव–विठ्ठल, विष्णू राजूरकर, शाहीर देवराव इ. चा समावेश आहे.भंडारा आणि गोंदिया या जिल्हयात शाहीर रामू, बळीराम पारधी, शाहीर सुका, बुधा, कन्नू–नन्नू, मधुकर बांते, मदन मस्ताना अंबादास नागदेवे, बुधा–शाम, उत्तम–आशीर्वाद, सुबोध कान्हेकर, जयकुमार राहांगडाले, ताराचंद गजभिये, तन्नू बिसेन, शिशुपाल, परसराम, देवराम, सेवक उके, यशवंत रंगारी, छत्रपती उईके इ. शाहिरांचा

अंतर्भाव आहे.

झाडीपट्टीतील शाहिरांनी आपल्या तमाशाच्या कवनातून समाजातील विविध विषयांना स्पर्श केला. त्यांच्या तमाशाचा मुख्य उद्देश लोकानुरंजन असले तरीपण ते त्यातून समाजाला प्रबोधन आणि समाजात नवजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक प्रश्नांना या लोकनाट्यांद्वारा हाताशी घेऊन त्यावर त्यांनी कवने केली आणि सामाजिक प्रश्नांची उकल करण्याचा ध्यास मनी धरला.

सांप्रतकाळी समाजात दिवसेंदिवस फोफावत चाललेला महाभयंकर व दुर्धर रोग म्हणजे व्यसनाधिनता होय. या व्यसनाधिनतेवर संत–महंतांनी भाष्य केले. महानुभाव पंथापासून ते वारकरी पंथापर्यंतच्या सर्व संतांनी व्यसनाधिनता निषिद्ध मानली. तरीपण आजही लोक व्यसनाच्या आधिन झालेले दृष्टीस पडतात. संसार देशोधडीला मिळाले. कित्येक माणसे जीवनातून उठले. असे अनेक दुष्परिणाम व्यसनांमुळे निर्माण झाले. म्हणून अशा या व्यसनाधिनतेवर आसूड ओढताना शाहीर अंबादास नागदेवे कवन रचतात,

"याच्या दारुमुळे फाग–राखरांगोळी आग–बसला लावून घरादाराला
गावातूनी काढा याला–लावूनिया जोडा–हा साला।।धृ।।
हे किडे गंध्या नालीचे भडवे
खुद्द सडले अन् दुसऱ्याला सडवे
घरी नाही थारा लागे तेल आणि मीठ
गल्लोगल्ली फिरे मागे लागे किटकिट
बायको अन पोरं घेती गळफास दोर
नाही वेळकाळ भर बाराला।।१।।
गेली पाटिलकी महाजनकी मातीत
जाती तुडविल्या लोकांच्या लाथित
कपडयाची सूध नाही नालीमध्ये मान
माशा तोंडामध्ये घसा करी गुणगान
याचा नेहमीचा ठेका याला दूर फेका
याचे रोजच हरवाराला ।।२।।"

शाहीर परसराम वाघमारे यांनी स्पृश्य–अस्पृश्य या वादावर कडाडून हल्ला केला. ते लावणीतून पाण्याचे महत्त्व विशद करतात.पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. पाण्यावर कोणाचाही मालकी अधिकार नाही. म्हणून शाहीर परसराम पाण्यासाठी सत्याग्रह करताना म्हणतात,

"पाण्यासाठी का तक्रार तहान लागली फार
अशी निर्दयी नार धर्म पाण्याचा पाण्याचा।।धृ।।
ऐक शेती घ्या शिवारी लई बनविल्या विहिरी
मालकाचा पत्ता नसून पायऱ्या असलेल्या बाहेरी
बाटली नसता जाण्याचा रस्ता पाणी घेण्याचा।।१।।
कुण्या धर्माचा पोर आहे बाटली आणि दोरं
नका हातावर देऊ गं पाणी काढतो मी भरपूर
त्रास कशाला तुझ्या जिवाला झोका घेण्याचा ।।२।।
तुझं माझं रक्तमांस आहे एक दोघाचं
फरक कशाचा सांग तू आता आहे का ध्यानात
करतो बडबड पाण्याचा हा काळ पुण्यवानाचा।।३।।
रीत भेदभावाची आहे तुमच्या मनाची
झाली ब्राम्हणाची मुलगी पत्नी बाबासाहेबांची
मनात आले तसेच केले सौदा पाण्याचा।।४।।
म्हणे परसराम हरिचंद जुने तुफानच बंद
अंबादासला देऊन सल्ला बोल हा गाण्याचा।।५।।"

शाहीर परसराम समाजातील जातीभेदावर कडाडून हल्ला चढवतात. 'तुझं माझं रक्तमांस आहे एकच दोघाचं' यातून ते समता प्रस्थापित करतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वाचा पुरस्कार करणारे शाहीर सवितराव गजभिये समाजात असलेली दरी कमी करण्यासाठी आणि समाजात बंधुता, एकता व मानवता टिकविण्यासाठी आंजरजातीय नोंदणी विवाहाचा पुरस्कार करतात.

"देऊ नको धोका, मज देऊ नको धोका
आंतरजाती लग्न करु आहे योग्य मौका।।धृ।।
ह्या कॉलेज जीवनात तू पडली त्या प्रेमात गं
मी गरीबाचा पोर पण तू श्रीमंताची लेक गं
तोड श्रृंखला भेदाची जाती अन् त्या पातीची
पूर्ण विचार कर आली संधी ही प्रियंका।।१।।
रक्त आपुले दोघांचे एकच नाते दूरचे
स्त्री पुरुष हया जाती दोन मुळी दिसेना तिसरे
तू साक्षर नवयुगाची कस लाव तू बुध्दीची
योग मिलनाचा आपला जणू एक झोका ।।२।।"

शाहीर सवितराव या कवनातून 'स्त्री–पुरुष ह्या जाती दोन मुळी दिसेना तिसरे' अशी समानतेची व मानवतेची शिकवण देतात. दुनियेत स्त्री–पुरुष या दोनच जाती ते मानतात. यातून ते जाती निर्मूलनाचा संदेश जनतेपर्यंत संक्रांत करतात.

शाहीर मधुकर बांते यांनी बुध्द, आंबेडकरी विचारांची प्रेरणा घेऊन शाहिरी–तमाशाच्या कवनांची रचना केली. शाहीर मधुकर बांते आपल्या कवनातुन सामाजिक विषमतेवर बोट ठेवतात. सवर्ण समाजातील माणसे विटाळाच्या नावाखाली अस्पृश्यांचा छळ करतात. म्हणून शाहीर बांते आपल्या कवनातून 'आमच्या साठीच विटाळाचा जन्म झाला काय?' असा उद्वेगपूर्ण सवाल करतात.

"त्या गौतमाच्या चरणी फूलं अश्रूंची वाहू दे
माझ्या दलितांसाठी प्राण गेले तरी जाऊ दे।।धृ।।
कितीतरी करती आमचा छळ हो छळ
आमचेसाठीच हा झाला हा विटाळ विटाळ
या विटाळाचा बदला मला धैर्याने घेऊ दे।।१।।
आमचे जीवन कुत्र्यापरी–अहो परी
असे जगणे गोष्ट नाही बरी
तुझा विचार असला रमा तुझ्यापाशीच राहू दे।।२।।
कसा पंडितांचा इतिहास–इतिहास
त्याच्यापासून झाला सत्यानाश–सत्यानाश
त्या अत्याचाराचा बदला मला धैर्याने घेऊ दे।।३।।
गुरु सदाशिव सावळादास
कवी मधुकर चरणाचे दास
गोड पाणी भिमाचे मधुर वाणीने गाऊ दे।।४।।"

शाहीर मधुकर बांते अत्याचाराचा बदला घेण्यासाठी सूडाने पेटून उठण्याची भाषा करतात. त्यांच्यात संघर्षप्रवणता दिसून येते. त्यांना समाजपरिवर्तनाची प्रबळ इच्छा आहे.

शाहीर अंबादास नागदेवे निरक्षरतेबद्दल म्हणतात,

"अज्ञानाने होऊन आंधळे डोळे असूनी असे
मानवा जीवन तुझे हे कसे।।धृ।।
जिर्ण ते झाले चारही वर्ण
ज्ञानापुढे ते होऊन शर्ण
वणवा लागुन जळे चहू दिशा
पण अंधाराला पुसे।।१।।
अक्षरातूनी डोळे उघडले
मुके बोलले बहिरे बिघडले
परिपक्वाच्या प्रेरित भावना
शब्दरूपाने वसे।।२।।
क्षितिजावरुनी जाळून चंदन
त्या महामानवा पहिले वंदन
शिक्षणावाचून नाही दुजे धन
अमर मनी खूप ठसे।।३।।"

शाहीर अंबादास आपल्या कवनातून 'शिक्षणाशिवाय दुसरे कोणतेही धन नाही' असे स्पष्ट करून साक्षरतेचा गौरव करतात.

शाहीर सुबोध कान्हेकर माणसाला सन्मार्गावर चालण्यास प्रवृत्त करतात. 'मरावे परी कीर्ती रूपे उरावे' या संत वचनाचा आधार घेऊन ते माणसाला 'माणुसकी' जागविण्याचा सल्ला देतात. 'जीवन अमूल्य आहे' याची जाणीव करून देतात.

"भल्या माणसा जाशील जाशील रे वाया
अहंकार सोडून जाग—सत्य शोधाया।।धृ।।
मुश्किलीने आला तू या बाजारी
ऐकूनी बनला का तू अहंकारी?
कसा विसरून गेला—प्रेम, प्रिती, माया।।१।।
करतो अधर्म तुझ्या मनामध्ये क्रोध
करूनिया चिंतन घे सत्याचा शोध
येईल तेच कामी संसार तराया।।२।।
कळले ना तुजला या जीवनाचे मर्म
कीर्ती ते देईल तुला तुझे कर्म
समजावी सुबोधा आहे अनमोल काया।।३।।"

शाहीर सुबोध कान्हेकर माणसाला जीवनाचे मर्म उलगडण्यासाठी आधी सत्याचा शोध घेण्याचा सल्ला देतात.

शाहीर नामदेव लांजेवार शाहिरीतून कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करतात. 'कुटुंब लहान—सुख महान' याकरिता ते कुटुंब नियोजन करणे ही काळाची गरज मानतात. त्यांचे कुटुंबनियोजनाचे कवन पुढीलप्रमाणे;

"हल्ली सुखात घालावया जीवन करुन घ्या कुटुंबनियोजन।।धृ।।
घरभर अशाने ते होतील मूलं—पेटणार नाही कधीही चूलं
कधी मिळे अन्न कधी उपाशी—मरावे लागेल लागून फाशी
वाईट नाही सरकारचे धोरण—करून घ्या कुटुंबनियोजन।।१।।
दोन मुलांचा कुटुंब छान—मिळतो सदा सुख महान
कवी नामदेवचा ऐक विचार—दोघापैकी कोणी चला व्हा तयार
व्यवस्थित होईल मुलाबाळाचे शिक्षण—करून घ्या
कुटुंबनियोजन।।२।।"

शाहीर उत्तम—आशीर्वाद यांनी आपल्या कवनातून गर्भ निदान करून समाजातील माणसे मुलींची भ्रुणहत्या करतात. हे पाहून त्यांच्या मनात कळवळा निर्माण होतो. म्हणून गर्भनिदान करू नका, असा सल्ला ते देतात. पुढे समाजाला प्रश्न करतात की, 'मुलगी जर नसली तर हा संसार होईल का?विचार करा बांधवानो मुलगा कुवारा राहील का?' असे ते समाजाला अंतर्मुख करण्यास भाग पाडतात. त्यांचे गर्भनिदानपर गीत पुढीलप्रमाणे;

"विचार करा भाऊ—आलं विप्रीत मानवा
विप्रीत मानवा—विप्रीत मानवा ऽऽ
लोभाने मारु नका मुली—या देशाला वाचवा।।धृ।।
पुर्षाला बाई आनी मुलाला आई
कोठून येणार समजे ना काही
होईल का उन्नती—हा प्रश्न माझा सोडवा।।१।।
तुम्ही विचारवंत—भारतभुमीचे लाल
पुढे काय होणार या मानवाचे हाल
कुन्र्याला सत राहील भाऊ—पुढे पत नाही मानवा।।२।।
कल्पांती करु नका गर्भनिदान
पैशासाठी घेऊ नका मुलींचे प्राण
उत्तम—आशीर्वादाला जाग आली भाऊ
हा हित माझा जागवा।।३।।"

याप्रकारे झाडीपट्टीतील तमाशाच्या शाहिरांनी आपल्या कवनांतून समाजस्थितीचे यथोचित दर्शन घडविले. सामाजिक जीवनातील विषय, प्रसंग आणि घटना यांचे हुबेहूब चित्रण रेखाटले आहे. या शाहिरांनी ज्याप्रमाणे पौराणिक, ऐतिहासिक विषय निवडले त्याचप्रमाणे त्यांनी काळानुरूप सामाजिक विषयही हाताळले. आपल्या सभोवती घडणाऱ्या घटना व प्रसंग यांचे शाहिरांना भान असल्याचे दिसते. समाजातील प्रचलित ज्वलंत समस्यांचे विषय घेऊन तमाशाने दारूबंदी, कुटुंबकल्याण, हुंडाबंदी, व्यसनमुक्ती, साक्षरता अभियान, जातीभेद निर्मूलन, गर्भनिदान, इत्यादी विषय स्वीकारून जनतेत आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच या विषयावरील कवने रचून शाहिरांच्या प्रतिभेने आपली सामाजिक जाणीव स्पष्ट केली, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरु नये.

संदर्भग्रंथ सूची :—

1) हिरामण लांजे, 'समग्र झाडीपट्टी'
2) डॉ. हरिश्चंद्र बोरकर, 'खडीगंमत विदर्भाचे लोकलेणे'
3) डॉ. पुरुषोत्तम काळभूत, 'लोकनाट्य उद्गम आणि विकास'
4) लक्ष्मणशास्त्री जोशी, 'भारतीय संस्कृतिकोश' खंड Š
5) डॉ. प्रभाकर मांडे, 'लोकरंगभूमी'